# An evening in Aurangabad..

# AURA 2018
## AURANGABAD



Regular concert series of Indian Classical dance showcasing the rich and diverse heritage of Aurangabad region.

**Every Friday, Saturday, Sunday; 7.30-8.30 pm at MAHAGAMI Gurukul, MGM, Aurangabad.**

A unique dance concert series named AURA-Aurangabad is being launched which aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances. This series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city being presented at MAHAGAMI will bring to life this wide spectrum of legends, master-pieces and monuments through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi, etc. Curated by

Parwati Dutta
(Director, MAHAGAMI)



presented by

MAHĀGĀMĪ

supported by

CII
Confederation of Indian Industry



Platinum sponsor

BAGLA Total Solution

Silver sponsor

Endress+Hauser
People for Process Automation

**For bookings or enquiry,**
call +91 9372093189, +91 240 2484919.
(Time - 10.00 am to 6.00pm)
Information also available in Local Hotels,

Follow us on Facebook
AURA-Aurangabad

# Aura Aurangabad 2018

13 Oct 2018 | Kathak | Mahagami Ensemble

14 Oct 2018 | Bharatnatyam | Kathak

Bharatnatyam Performance by Abha Athanikar Nidhi Patel Mumbai

Kathak Performance by Ruhi Masodkar Nagpur

03 Nov 2018 | Sattriya | Bharatnatyam

Sattriya by Preetilekha Chowdhury

Bharatnatyam By Shreya Kompally, Hyderabad

04 Nov 2018 | Kathak | Bharatnatyam

Kathak by Surabhi Parashar

Bharatnatyam by Kavya Kasinathan

10 Nov 2018 | Kathak | Kuchipudi

Kathak By Yashaswini S

Kuchipudi by Vaidehi Kulkarni

11 Nov 2018 | Kathak | Smita Bagul-More

17 Nov 2018 | Kathak | Bharatnatyam

Bharatnatyam by Anjana Sudheendra

Kathak By Priyanka Srikrishnan and Nilakshi Khandkar

18 Nov 2018 | Kathak | Bharatnatyam

Bharatnatyam by Atanu Das

Kathak Laxminarayan Jena

24 Nov 2018 | Odissi | Bharatnatyam

Odissi by dr Biswajit Dash

Bharatnatyam by Zuairiyah Mouli

25 Nov 2018 | Bharatnatyam | Kalashree Nrityalaya | Pune

01 Dec 2018 | Bharatnatyam | Ashesha Saha | Kolkata

02 Dec 2018 | Kathak | Partha Mandal and Mahagami Ensemble

08 Dec 2018 | Odissi | Kathak

City based dance institute Mahagami has organized the sixth edition of 'Aura Aurangabad' dance concert. The presentations have been curated for the tourists and art lovers with respect to information and insight about local heritage and cultural experience.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, WEDNESDAY, 28 NOVEMBER 2018
Aurangabad FIRST PAGE 8

## Kalashree Nrityalaya presents Bharatanatyam



Kalashree Nrityalaya, Pune presents Bharatanatyam compositions.

**Aurangabad, Nov 27:** The 10th concert under Aura-Aurangabad concerts series was presented here on November 25.

Kalashree Nrityalaya, Pune presented Bharatanatyam compositions including Ganesh Stuti, Alaripu, Keertanam (Ganga), Todayamangalam and Keertanam (Natanam Adinar). Composer was Gopal Krishna Bharatiyar.

Javali was performed by Guru Pramadwara Kittur. It portrays a Naayika who is angry with her lover. She asks him, "Oh Swami, what of your high and mighty promises? You have not kept your word." The performance also featured Tandav Laasya.

The next concert under Aura Aurangabad will be held on December 1 at 7 pm at MAHAGAMI.

2 SUNDAY TIMES OF INDIA, AURANGABAD OCTOBER 14, 2018 TIMES CITY

## 6th edition of Mahagami's dance concert begins

**Aurangabad:** City-based dance institute Mahagami has organised the sixth edition of 'Aura Aurangabad' dance concert that is scheduled to start from October 13. Concerts will be held at Mahagami on every Saturday and Sunday from 7pm to 8 pm till December end that will showcase various glimpses of Aurangabad's heritage through dance perfomances.

The presentations have been curated for tourists and art lovers with respect to the information and insight about local heritage and cultural experience. On Saturday, Mahagami ensemble performed a Kathak piece at 7pm. On Sunday, a bharatanatyam duet by Aabha Athanikar & Nidhi Patel and solo Kathak performance by Ruhi Masodkar has been lined up. Organisers have appealed to heritage lovers and tourism stakeholders to extend support to the event. TNN

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SUNDAY, 11 NOVEMBER 2018
Aurangabad FIRST PAGE 3

## Kuchipudi and Kathak evoke good appreciation

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, NOV 10

The 5th concert under Aura-Aurangabad concerts series was presented on Saturday at Mahagami.

The concert included Kuchipudi by Vaidehi Kulkarni and Kathak by Yashaswini S.

First performance by Yashaswini S presented the Kathak compositions like Mata Bhavani: an ode to mother goddess seeking her blessings while praising her benevolence; Bajatha Mrudanga which explores the beauty of the cosmic couple Shiva and Parvathy dancing to the sounds of Mrudanga.

Thumri, a Bindadin composition performed in the Thumri aang where the Vipralabdha Nayika Bhaav was explored.

The 2nd performance by Vaidehi Kulkarni presented Lekha an extract from Bhama Kalapam. In this, Satyabhama expresses her feelings of separation from Krishna.

Another performance was Ramdas Keertana. Ramdas pleads to Sita to recommend his case to Lord Rama and save him from all troubles.





Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, MONDAY, 19 NOVEMBER 2018
Aurangabad FIRST
PAGE 3

BOTTOMLINE

# Dance performances impress audience

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, NOV 18

Anjana Sudheendra presented a performance of Bharatanatyam and Priyanka Srikrishnan and Nilakshi Khandkar presented Kathak in the 7th concert under Aura-Aurangabad concerts series here at Mahagami today. In the first performance, Anjana Sudheendra presented Bharatanatyam compositions like Naada Tanumanisham, Raaga - Chittaranjani, Adi talam; Jayadeva Ashtapadi Raaga: Vaasanti, Mishra Chapu talam and Tillana Raaga: AmrithaVarshini, Aadi Talam winning the heartes of the discerning audience. Priyanka Srikrishnan and Nilakshi Khandkar presented Kathak compositions. Kathak Stuti, Dhamaar and Anadi Anant. The performance was appreciated by one and all.



Priyanka Srikrishnan and Nilakshi Khandkar



Anjana Sudheendra

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
Aurangabad FIRST
AURANGABAD, TUESDAY, 16 OCTOBER 2018

# 2-day Aura-Aurangabad concert series concludes

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, OCT 15

Two-day Aura-Aurangabad concerts series, the 6th season of cultural tourism initiative, hosted by Mahagami concluded on Sunday.

Aura-Aurangabad is a dance concert series conceptualisded by Parwati Dutta with an aim to showcase the city's heritage through Indian Dance Heritage.

Kathak by Ruhi Masodkar and Bharatanatyam duet by Aabha Athanikar and Nidhi Patel presented their art and enthralled the audience at Dyavprithivi, Mahagami, MGM Campus.

Aabha Athanikar and Nidhi Patel presented Pushpanjali, Ardhanari, Devi and Tillana dance.

In the second performance, Ruhi Masodkar presented the Kathak dance forms like Lingaashtakam, Nrutta Part, Gatbhaav and Thumri. Another concerts will be held at Mahagami from 7 to 8 pm on November 3.



Students performing on the concluding day of the 6th two-day Aura-Aurangabad concert series which was hosted by Mahagami in Aurangabad at MGM.

These dance concerts are of great cultural significance for the tourists and art-lovers. More than 10,000 tourists gained an insight about Indian cultural heritage through these dance concerts.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SUNDAY, 14 OCTOBER 2018
Aurangabad FIRST
PAGE 6

# 6th season of Aura Aurangabad begins

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, OCT 13

The 6th season of Aura Aurangabad began on Saturday thereafter concerts will be held at Mahagami on Saturday and Sunday from 7 pm to 8 pm till December 2018 in which various glimpses of Aurangabad Heritage will be presented through Dance Heritage. On Saturday the Mahagami ensemble performed Kathak at 7 pm at Dyavaprithivi.

On October 14 Bharatanatyam duet Aabha Athanikar and Nidhi Patel and Kathak solo performance by Ruhi Masodkar will be held. Aabha Athanikar and Nidhi Patel are students from PAVI (Pavitra Art Visual Institute) Mumbai. Ruhi Masodkar is a disciple of Guru Late Dr Sadhana Naphade. She is junior fellowship holder from ministry of culture 2017-18 and on the panel of artist for festivals of India abroad by Ministry of Culture, GOI.

Heritage-lovers, media, tourism associations, tour guides, hotel associations, travel agencies and concert-goers are requested to extend their whole-hearted support in making this unique dance concert series successful. These dance concerts are of great cultural significance for the tourists and art-lovers with respect to the immense information and insight about Aurangabad Heritage and cultural experience. More than 10,000 tourists gained an insight about Indian Cultural Heritage through these dance concerts.



Mahagami ensemble performs Kathak at Dyavaprithivi in Aurangabad on Saturday.

औरंगाबाद । सोमवार, २६ नोव्हेंबर २०१८ महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद TIMES OF INDIA

# शास्त्रीय नृत्यांच्या दुर्मिळ रचनांना दाद

## 'औरा-औरंगाबाद' महोत्सव रंगला

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

ओडिसी आणि भरतनाट्यम यांच्या प्रभावी नृत्याविष्काराने 'औरा-औरंगाबाद' नृत्य महोत्सव लक्षवेधी ठरला. ओडिसी व भरतनाट्यमच्या दुर्मिळ रचनांना रसिकांनी मनस्वी दाद दिली. मुद्राभिनय व पदन्यासाचे प्रभावी दर्शन घडवत कलाकारांनी महोत्सव गाजवला.

महागामी नृत्य संस्थेच्या 'औरा-औरंगाबाद' नृत्य श्रृंखला महोत्सवात डॉ. विश्वजीत दास यांचे ओडिसी आणि झौरिया मौली यांचे भरतनाट्यम सादरीकरण झाले. 'महागामी'च्या सभागृहात शनिवारी सायंकाळी कार्यक्रम झाला. या नवव्या शृंखलेची सुरुवात डॉ. विश्वजीत यांच्या ओडिसीने झाली. शुद्ध नृत्याची अनुभूती देणारी 'पल्लवी' रचना त्यांनी सादर केली. 'श्रीनगर रासा'वर आधारित नृत्य रचना 'सावेरी' रागात होती. पं. भुवनेश्वर मिश्रा यांनी संगीतबद्ध केलेली रचना गुरू केलूचरण महापात्र यांनी नृत्यबद्ध केली होती. या शास्त्रशुद्ध रचनेने रसिकांचे लक्ष वेधले. मध्ययुगातील प्रसिद्ध कवी गोपालकृष्ण पट्टनायक यांनी लिहिलेल्या गीतावर 'अभिनय' सादर केला. यशोदा आणि बालकृष्णाचे नाते आणि संवाद उलगडणारी रचना लक्षवेधी ठरली. उडिया भाषेतील रचना 'राग भैरवी'त होती. गुरू केलुचरण महापात्र यांनी नृत्यबद्ध केलेल्या पारंपरिक रचनेने महोत्सवाची रंगत वाढवली.

दुसऱ्या सत्रात झौरिया मौली यांनी भरतनाट्यम सादर केले. 'कीर्तनम' या प्रकारात देवीची स्तुती रचना सादर झाली. निलांबरी रागातील रचनेत देवीच्या प्रेमळपणावर प्रकाश टाकण्यात आला. ही रचना गुरू राम वैद्यनाथन यांनी नृत्यबद्ध केली होती. श्रीकृष्णाला भेटण्यासाठी आतूर नायिकेची मनोवस्था सांगणारी 'चलिये कुंजन मो' ही रचना रसिकांची दाद घेऊन गेली. महाराजा स्वाती तिरुनल यांची रचना वेगळेपण बिंबवून गेली. राग वृंदावनी आणि आदितालातील रचना मौली यांच्या मुद्राभिनय व पदन्यासाने विशेष रंगली. कीर्ती रामगोपाल यांनी रचना नृत्यबद्ध केली होती. 'शिवपद्म' रचनेतून शिवाची आराधना तन्मयतेने सादर करण्यात आली. देवाचे मोठेपण आणि त्याच्या कृपेची छाया सदोदित ठेवण्याची प्रार्थना नृत्यशैलीने रसिकांना मोहीत करणारी होती. कीर्ती रामगोपाल यांनी रचना नृत्यबद्ध केली होती.

या महोत्सवाला 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यटक आणि रसिकांनी विविध रचनांना भरभरून प्रतिसाद दिला.


झौरीया मौली


डॉ. विश्वजीत दास

Today सकाळ
औरंगाबाद सोमवार, ३ डिसेंबर २०१८ | ६


औरंगाबाद : महागामी नृत्य गुरुकुलतर्फे आयोजित 'ऑरा औरंगाबाद' कार्यक्रमात कथ्थक सादरीकरण करताना महागामीच्या कलाकारांचा चमू.

ओडिसी आणि भरतनाट्यम यांच्या प्रभावी नृत्याविष्काराने 'औरा-औरंगाबाद' नृत्य महोत्सव लक्षवेधी ठरला. ओडिसी व भरतनाट्यमच्या दुर्मिळ रचनांना रसिकांनी मनस्वी दाद दिली. मुद्राभिनय व पदन्यासाचे प्रभावी दर्शन घडवत कलाकारांनी महोत्सव गाजवला.

महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद सोमवार, २४ डिसेंबर २०१८
औरंगाबाद TIMES OF INDIA

# पारंपरिक 'कीर्तनम'ची रसिकांवर मोहिनी

## 'औरा-औरंगाबाद' महोत्सव रंगला

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

'कीर्तनम' आणि 'देवी वर्णम' या पारंपरिक रचनांच्या लालित्यपूर्ण सादरीकरणाने औरा-औरंगाबाद महोत्सव लक्षवेधी ठरला. जुगनू कापडिया आणि त्रिवेणी ग्रुपने बहारदार सादरीकरण केले. भारतीय संस्कृतीची नृत्यातून अचाट दर्शन घडवत कलाकारांनी रसिकांना खिळवले.

महागामी संस्थेच्या 'औरा-औरंगाबाद' नृत्य श्रृंखलेत जुगनू कापडिया आणि त्रिवेणी ग्रुपने भरतनाट्यम सादरीकरण केले. शारंगदेव सदन येथे शनिवारी सायंकाळी कार्यक्रम रंगला. पहिल्या सत्राची सुरुवात जुगनू कापडिया यांच्या भरतनाट्यमने झाली. 'कीर्तनम' रचनेतून पार्वती स्तुती सादर करून जुगनू यांनी लालित्यपूर्ण पदन्यासाचा आविष्कार दाखवला. भोजराज यांनी संगीतबद्ध केलेली ही राग 'निलांबरी'तील रचना वैशिष्ट्यपूर्ण होती. नंतरच्या 'कीर्तनम'मधून भगवान शिवाची आराधना करण्यात आली. रेवती रागातील ही रचना अवघे वातावरण भारावून गेली. कृष्णावतारावर आधारीत कीर्तनमने जुगनू यांनी नृत्य सांगता केली. गतिमान नृत्य आणि मुद्राभिनयाचा उत्कट आविष्कार रसिकांची दाद घेऊन गेला. दुसऱ्या सत्रात त्रिवेणी ग्रुप (गुजरात) यांनी भरतनाट्यम सादरीकरण केले. 'देवी अलारिपू'द्वारे नृत्य सुरू करण्यात आले. या पारंपरिक रचनेतून देवीची आराधना आणि भक्तिभाव दाखवण्यात आला. 'देवी वर्णम' सादर करुन कलाकारांनी सांगता केली. आदितालातील रचनेद्वारे पार्वतीची महती सादर करण्यात आली.



महागामीच्या औरा औरंगाबाद नृत्य श्रृंखलेत भरतनाट्यम रंगले.

### नवरस लक्षवेधी

रंजनी, शंकरी, भवानी, शिवप्रिये, त्रिशूलिनी इत्यादी नावांनी ओळखल्या जाणाऱ्या पार्वतीचे नवरसाद्वारे महात्म्य कलाकारांनी वर्णन केले. या अभ्यासपूर्ण नृत्याला रसिकांनी विशेष दाद दिली. नवरसाची अनुभूती विशेष लक्षवेधी ठरली. आध्यात्मिक कथानक शास्त्रीय नृत्यातून मांडण्याचे कलाकारांचे कसब महोत्सवाची उंची वाढवणारे होते. या कार्यक्रमाला 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांच्यासह रसिक व पर्यटक उपस्थित होते.

---

औरंगाबाद • मंगलवार 16 अक्तूबर 2018
लोकमत समाचार • अपना औरंगाबाद

नृत्य



औरंगाबाद में महागामी की ओर से औरा औरंगाबाद के अंतर्गत रविवार को प्रस्तुति देती हुई नृत्यांगनाएं.

'कीर्तनम' आणि 'देवी वर्णम' या पारंपरिक रचनांच्या लालित्यपूर्ण सादरीकरणाने औरा-औरंगाबाद महोत्सव लक्षवेधी ठरला. गतिमान नृत्य आणि मुद्राभिनयाचा उत्कट आविष्कार रसिकांची दाद घेऊन गेला.

यंदा औरा-औरंगाबाद उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे. अजिंठा-वेरुळ लेणीचा वारसा असलेल्या औरंगाबाद शहरात 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांनी हा उपक्रम सुरु केला.

औरंगाबाद । मंगळवार, २७ नोव्हेंबर २०१८ महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद TIMES OF INDIA



# भरतनाट्यम् नृत्यातून दशावतार

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

भरतनाट्यम्‌च्या अनवट रचनांचे प्रभावी दर्शन घडवत कलाश्री नृत्यालयाच्या कलाकारांनी 'औरा-औरंगाबाद' महोत्सव गाजवला. या नृत्यात नाविन्य जपताना मूळ रचनांचा उत्कट आविष्कार घडवला. दशावताराचे दर्शन घडवणारी नृत्य रचना सर्वाधिक दाद घेऊन गेली.

महागामी नृत्य संस्थेच्या 'औरा-औरंगाबाद' महोत्सवातील दहाव्या नृत्य श्रृंखलेत पुणे येथील कलाश्री नृत्यालयाच्या कलाकारांनी भरतनाट्यम सादरीकरण केले. 'महागामी'च्या शारंगदेव सदनात रविवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. 'गणेशस्तुती'ने सादरीकरण सुरू झाले. विघ्नहर्ता आणि कलेची देवता असलेल्या गणेशाची आराधना चित्ताकर्षक होती. ऋद्धी सिद्धीचे स्मरण करताना त्यांचे भावबंध कलाकारांनी नृत्य रचनेतून प्रभावीपणे उलगडले. 'अलारिपू' सादरीकरण तन्मयतेने रंगवले. नृत्याचा हा शुद्ध भाव असून 'अलारिपू' म्हणजे कळी. या कळीचे फुलणे नृत्यांगणांनी उत्तमरित्या दाखवले. अत्यंत संथ गतीने सुरू झालेले सादरीकरण वेगवान टप्प्यावर संपले. हा नृत्य प्रवास अचंबित करणारा ठरला. 'कीर्तनम' (गंगा) या रचनेतून गंगा नदीचे आरती करण्यात आली. गंगेचे प्रवाही असणे प्रत्येक मानवाच्या जीवनाशी जवळचे साधर्म्य दाखवते. पवित्र आणि ऋणानुबंध यांची भावना असलेली नृत्य रचना रसिकांची दाद घेऊन गेली. 'तोडायमंगलम' हा मंगलाचरण तुकडा सादर झाला. भगवान विष्णूचे दशावतार दाखवून त्याला वंदन करणारी ही प्रस्तुती प्रभावी ठरली. प्रत्येक अवताराची कथा आणि वेगळेपण दाखवणे कलाकारांसाठी आव्हानात्मक होते. मात्र, कसबी नृत्यांगणांनी आव्हान लिलया पेलले. त्यानंतर गोपालकृष्ण भारतीयार यांनी संगीतबद्ध केलेले वसंत रागातील 'नटनम आदिनार' हे कीर्तनम सादर झाले. नृत्याचा राजा असलेल्या नटराजाच्या भावमुद्रा आणि महात्म्य या माध्यमातून दाखवण्यात आले. 'तांडव लास्या'ने सांगता करण्यात आली. 'उर्ध्व तांडवम' ही निकोप आणि खेळकर नृत्य स्पर्धा शिव आणि पार्वतीत होते. तांडव आणि लास्य यांचा नृत्याविष्कार अत्यंत तरल पद्धतीने सादर करुन कलाकारांनी दाद मिळवली. सांघिक नृत्यातील एकरुपता 'कलाश्री'च्या कलाकारांनी दाखवली. गतिमान पदन्यास आणि लक्षवेधी भावमुद्रा यांचे प्रभावी दर्शन घडवत रसिकांना खिळवून ठेवले. या कार्यक्रमला 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांच्यासह रसिक व पर्यटक उपस्थित होते.

### रसिकांचा प्रतिसाद

'औरा-औरंगाबाद' महोत्सवातून औरंगाबाद शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा पोहचवला जात आहे. देश-विदेशातील पर्यटक आणि रसिकांना शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून मूळ संस्कृतीच दर्शन घडवण्यात येत आहे. दर शनिवार-रविवारी सायंकाळी सात वाजता महोत्सव सादर होत आहे. जाणकार रसिकांनी महोत्सवाला प्रतिसाद दिला आहे.

महाराष्ट्र टाइम्स औरंगाबाद सोमवार, १२ नोव्हेंबर २०१८
औरंगाबाद TIMES OF INDIA

# पौराणिक कथेची नृत्यमय उकल



यशस्विनी एस.

## 'औरा-औरंगाबाद' उपक्रमाला रसिकांची दाद

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

कथक आणि कुचिपुडी नृत्यातून उलगडलेल्या पौराणिक कथांनी रसिकांना विलक्षण अनुभूती मिळाली. 'औरा-औरंगाबाद' उपक्रमात नृत्य कलावंत यशस्विनी एस. आणि वैदेही कुलकर्णी यांनी बहारदार सादरीकरण केले. दुर्मिळ नृत्य रचना या उपक्रमाचे वेगळेपण ठरले आहे.

महागामी नृत्य संस्थेच्या 'औरा-औरंगाबाद' या नृत्य श्रृंखला उपक्रमात नृत्यांगणा यशस्विनी एस. यांचे कथक आणि वैदेही कुलकर्णी यांचे कुचिपुडी सादरीकरण झाले. महागामीच्या रंगमंचावर शनिवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. पहिल्या सत्रात यशस्विनी यांनी कथक सादरीकरण केले. या नृत्याला 'माता भवानी' या पारंपरिक रचनेने सुरुवात झाली. चौतालातील राग बागेश्रीवर आधारित रचना देवीची वंदना करणारी होती. नृत्यासाठी साधकाला ऊर्जा आणि उत्साह देण्याचे मागणे रचनेतून करण्यात आले, तर 'बजता मृदंग'मधून शिव-पार्वती यांचे मृदंगावरील नृत्य सादर करण्यात आले. तीन तालातील रचना रसिकांना सुखावून गेली. मिश्र रागातील 'ठुमरी' यशस्विनी यांनी अप्रतिम रंगवली. कृष्ण सख्याची वाट पाहणाऱ्या प्रेयसीची भावव्याकूळता नृत्यातून दाखवण्यात आली. कृष्णाचा अवखळ स्वभाव ठावूक असलेल्या प्रेसयीच्या मनात नानाविध विचारांचे काहूर माजते. तरीही कृष्णाची ओढ कमी होत नाही. हा भेटीचा पट मांडणारी तीन ताल-दादऱ्यातील ठुमरी रसिकांनी विशेष भावली.



### वैदेही कुलकर्णी

दुसऱ्या सत्रात वैदेही कुलकर्णी यांनी कुचिपुडी नृत्य सादर केले. 'लेखा' नृत्य रचनेतून सत्यभामाला कृष्णाबद्दल वाटणारी आत्मियता दाखवण्यात आली. सत्यभामाने पत्र लिहिल्यानंतर निर्माण झालेले नाट्य खिळवून ठेवणारे होते. पौराणिक कथानकाला नृत्यातून नेमके मांडण्याचे कसब कलाकारांनी दाखवले आदितालातील व आरभी रागातील रचनेचे नृत्य दिग्दर्शन डॉ. वेम्पती चिन्ना सत्यम यांचे होते. 'रामदास कीर्तना'ने वैदेही यांनी नृत्याची सांगता केली. अहिली रागातील रचनेचे नृत्य दिग्दर्शन गुरु मंजू भार्गवी यांचे होते. या कार्यक्रमाला पर्यटकांसह रसिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

### संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न

यंदा 'औरा-औरंगाबाद' उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे. अजिंठा-वेरूळ लेणीचा प्राचीन वारसा असलेल्या औरंगाबाद शहरात 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांनी हा उपक्रम सुरू केला. देश-विदेशातील पर्यटकांना औरंगाबाद परिसराचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व सांगण्याचा हा चाकोरीबाह्य प्रयत्न आहे. आतापर्यंत शेकडो विदेशी पर्यटकांनी शास्त्रीय नृत्य पाहिले आहे. दर शनिवार-रविवारी सादर होणाऱ्या या उपक्रमाशी हजारो रसिक जोडले गेले आहेत.

3 | लोकमत समाचार | औरंगाबाद • गुरुवार 22 नवंबर 2018

आयोजन • कथक और भरतनाट्यम नृत्य प्रकार के पदन्यास

# औरा-औरंगाबाद में नृत्य की मनोहारी प्रस्तुति

औरंगाबाद। 21 नवंबर। लोस सेवा

सांस्कृतिक पर्यटन को बढ़ावा देने के उद्देश्य से आयोजित औरा- औरंगाबाद नृत्य श्रृंखला के आठवें हिस्से की प्रस्तुति 17 और 18 नवंबर को सफलतापूर्वक की गई. महागामी की संचालिका तथा वरिष्ठ नृत्यांगना पार्वती दत्ता की योजना से आयोजित इस कार्यक्रम में दर्शकों को शास्त्रीय नृत्य की सुदंर प्रस्तुति देखने को मिली.

यह कार्यक्रम महागामी गुरुकुल के शारंगदेव सदन में आयोजित किया गया था. शनिवार के सत्र में अंजना सुधेंद्र ने भरतनाट्यम और प्रियंका श्रीकृष्णन् व नीलाक्षी खांडकर ने कथक नृत्य पेश किया. नृत्यांगनाओं की पदन्यास पर पकड़, देह बोली और हाव-भाव से पेश की जाने वाली मुद्राओं ने दर्शकों को मंत्रमुग्ध कर दिया. रविवार के सत्र में पुरुष नर्तकों ने नृत्य पेश कर दर्शकों की वाहवाही बटोरी. अतनू दास ने भरतनाट्यम और लक्ष्मीनारायण जेना ने कथक नृत्य पेश किया. अतनू ने रंजनी माला नामक कीर्तन नृत्यमय तरीके से प्रस्तुत किया. महाराज स्वाति तिरुनल रचित 'शंकरा श्री...' नामक हिंदी भजन पेश किया.

दूसरे सत्र में आनंद तांडव प्रकार के तहत लक्ष्मीनारायण द्वारा दिखाई गई ऊर्जा अपूर्व थी. डमरु और मृदंग के ताल पर त्रिशूल हिलाते हुए नृत्य करने वाले शंकर भगवान के रुप की विशेष सराहना की गई. तत्पश्चात 'राधा-माधव...' नृत्य प्रकार के तहत श्रीकृष्ण की प्रतीक्षा करने वाली राधा की व्यथा दिखाई गई.





औरंगाबाद में हाल ही में औरा-औरंगाबाद नृत्य श्रृंखला में नृत्य पेश करते हुए अतनू दास और लक्ष्मीनारायण जेना.

नृत्यांगनाओ की पदन्यास पर पकड, देह बोली और हाव-भाव से पेश की जाने वाली मुद्राओ ने दर्शकों को मंत्रमुग्ध कर दिया. रविवार के सत्र में पुरुष नर्तकों ने नृत्य पेश कर दर्शकों की वाहवाही बटोरी.

Today सकाळ औरंगाबाद सोमवार, २६ नोव्हेंबर २०१८ | ७

# महागामीच्या 'ऑरा औरंगाबाद'ला प्रतिसाद

## डॉ. बिस्वजित दास आणि झुऐरिया मौली यांचे बहारदार सादरीकरण

औरंगाबाद, ता. २५ : 'महागामी' नृत्य गुरुकुलातर्फे शहर पर्यटनवृद्धीत मोलाचे योगदान असलेल्या 'ऑरा औरंगाबाद' या कार्यक्रमात ओडिसी कलाकार डॉ. बिस्वजित दास आणि बांगलादेशच्या प्रसिद्ध भरतनाट्यम कलाकार झुऐरिया मौली यांचे बहारदार सादरीकरण शनिवारी (ता. २४) झाले. शहरात आलेल्या पर्यटकांनी आणि नृत्यरसिकांचा या उपक्रमाला चांगला प्रतिसाद लाभत आहे.

प्रथम डॉ. दास यांचे सादरीकरण झाले. त्यांनी ओडिसी कलाप्रकारातील श्रीरंग रासावर आधारित पं. भुवनेश्वर मिश्रा यांनी संगीतबद्ध आणि गुरू केलुचरण मोहपात्रा यांनी नृत्यबद्ध केलेल्या 'पल्लवी' या शुद्ध नृत्यप्रकाराने सुरवात केली. त्यानंतर गोपाल कृष्ण पट्टनायक या महान मध्ययुगीन कवीने रचलेल्या 'अभिनय'मध्ये यशोदा आणि बालकृष्णाची लीला सादर केली. झुऐरिया मौली यांनी भरतनाट्यममधील श्रीरंग लेहेरी सादर केली. त्यानंतर महाराजा स्वाती तिरुनाल यांचे 'चलिये कुंजन मो' हा वृंदावनी रागातील, आदी तालातील नृत्यविन्यास सादर केला. 'शिवपदम्'ने कार्यक्रमाचा समारोप झाला. रविवारी (ता. २५) पुण्याच्या कलाश्री नृत्यनिकेतनच्या कलाकारांचे सादरीकरण झाले.





औरंगाबाद : महागामी नृत्य गुरुकुलच्या 'ऑरा औरंगाबाद' कार्यक्रमात शनिवारी ओडिसी नृत्य सादरीकरण करताना डॉ. बिस्वजित दास. (दुसऱ्या छायाचित्रात) भरतनाट्यम आविष्कार दाखवताना बांगलादेशच्या प्रसिद्ध कलाकार झुऐरिया मौली.

## नृत्यम्






औरंगाबाद में शनिवार व रविवार को महागामी के प्रांगण में औरा-औरंगाबाद नृत्य शृंखला के तहत विभिन्न प्रस्तुतियां हुईं. प्रथम व द्वितीय चित्र में पुणे की कलाश्री नृत्य अकादमी की ओर से गणेश स्तुति ओर अलारिपु, कीर्तनम आदि प्रस्तुत करते हुए कलाकार. तीसरे चित्र में बंग्लादेश की भरतनाट्यम नृत्यांगना जुहैरिया मौली और ओडिसी नृत्य की प्रस्तुति देते हुए. अंतिम चित्र में विश्वजीत दास अपनी अभिनय प्रस्तुति के दौरान खास मुद्रा में. आगामी एक व दो दिसंबर को भी महागामी की ओर से औरा-औरंगाबाद के अंतर्गत नृत्य प्रस्तुतियां होंगी.



# महागामीत लालित्यपूर्ण पदन्यासाचा आविष्कार

## प्रतिसाद : औरा-औरंगाबाद नृत्य शृंखला

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : शहराच्या सांस्कृतिक पर्यटनास चालना मिळावी म्हणून महागामी गुरुकुलतर्फे दरवर्षी औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेचे आयोजन केले जाते. गुरुकुलच्या संचालिका तथा ज्येष्ठ नृत्यांगना पार्वती दत्ता यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या या उपक्रमाचे हे सहावे वर्ष आहे.

याअंतर्गत आयोजित नृत्य शृंखलेत रविवारी (दि. ११) कथ्थक नृत्यांगना स्मिता बागूल-मोरे यांचा लालित्यपूर्ण पदन्यास पाहून रसिक प्रभावित झाले. शिवध्यान श्लोक या पं. जसराज यांच्या रचनेने स्मिता यांच्या नृत्याविष्कारास सुरुवात झाली. शिवभक्तीवर आधारित या नृत्याने रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळविली.

तालांग आणि भावांग हे कथ्थक नृत्यप्रकाराचे दोन वैशिष्ट्य मानले जातात. यापैकी मीराबाईंच्या भजनावर नृत्यप्रस्तुती करुन स्मिता यांनी भावांग या प्रकाराचे विस्तृत दर्शन घडविले.

यानंतर कथ्थक नृत्यात महत्त्वपूर्ण मानल्या गेलेल्या धमार तालावर आधारित नृत्यातून त्यांनी वीर रस दाखविला. ताल, लय आणि उत्कृष्ट भावमुद्रा यांचा सुरेख संगम या नृत्यविष्कारातून दिसून आला. कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेंतर्गत पुढील नृत्यप्रस्तुती दि. १७ नोव्हेंबर रोजी सायं. ७ वा. महागामी गुरुकुल येथील शारंगदेव सदन येथे सादर होईल.



औरा-औरंगाबाद नृत्य-शृंखलेंतर्गत नृत्य सादर करताना नृत्यांगना स्मिता बागूल-मोरे.

तालांग आणि भावांग हे कथ्थक नृत्य प्रकाराचे दोन वैशिष्ट्य मानले जातात. यापैकी मीराबाईंच्या भजनावर नृत्यप्रस्तुती करुन स्मिता यांनी भावांग या प्रकाराचे विस्तृत दर्शन घडवले.





## ...भरतनाट्यम्!

औरंगाबादमध्ये शनिवारी अकराव्या औरा-औरंगाबाद सीरिजमध्ये कोलकाताच्या अशेषा साहा यांचे भरतनाट्यम रंगले.

औरंगाबाद TIMES मंगळवार, ११ डिसेंबर २०१८



# शास्त्रीय नृत्याची रसिकांना मोहिनी

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

'पद्मम', 'शब्दम' या शास्त्रीय नृत्य रचनांचे प्रभावी सादरीकरण करीत निवेदिता बडवे आणि आकांक्षा जोशी यांनी रसिकांची दाद मिळवली. 'औरा-औरंगाबाद' नृत्य महोत्सवात नृत्य सादर झाले. या वैविध्यपूर्ण नृत्याला रसिकांनी भरभरुन दाद दिली.

महागामी नृत्य संस्थेच्या 'औरा–औरंगाबाद' नृत्य शृंखलेत निवेदिता बडवे व आकांक्षा जोशी (पुणे) यांचे भरतनाट्यम सादरीकरण रंगले. शारंगदेव सदन येथे रविवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. नटराजाला 'पुष्पांजली'द्वारे वंदन करुन दोघींनी नृत्याला सुरुवात केली. गुरु, रसिक आणि संगीतकारांना कलाकारांना अभिवादन करणारी रचना विशेष ठरली. या पारंपरिक रचनेतून शास्त्रीय नृत्य परंपरेचा लौकीक मांडला गेला. आदितालातील रचना 'हंसध्वनी'त सादर झाली. नटराजाचे वर्णन कथन करणारी 'नटराज वर्णम' रचना लक्षवेधी ठरली. देवावरील अपार श्रद्धा व्यक्त करणारी रचना

## 'औरा-औरंगाबाद' महोत्सव रंगला

आशय आणि नृत्याने रसिकांना खिळवून ठेवणारी ठरली. शिवाला वंदन करणारी आणि थोरपण सांगणारी 'शब्दम' रचना महोत्सवाला उंची देणारी होती. शिव-पार्वती यांच्यातील संवाद नृत्यातून उलगडणारा 'पद्मम' प्रकार रसिकांची दाद घेऊन गेला.

विवाहासाठी मनधरणी करणाऱ्या पार्वतीची शिव समजूत घालतो. सौंदर्याचे वरदान लाभलेल्या पार्वतीची शिव विविध प्रकारे समजूत घालतात. तांडव नृत्याशी तुझे नृत्य साधर्म्य दाखवत नाही. अशा स्थितीत विवाह कसा करणार असा प्रश्न शिव विचारतात. संवाद आणि मनधरणीचे अप्रतिम वर्णन असलेली रचना राग 'वृंदावनी सारंग'मध्ये सादर झाली. पारंपरिक 'तिल्लाना' प्रकाराने सांगता झाली. 'राग हिंडोल'मधील रचनेला रसिकांनी प्रतिसाद दिला. यावेळी महागामी नृत्यसंस्थेच्या पार्वती दत्ता यांच्यासह रसिक उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । औरंगाबाद
रविवार, ९ डिसेंबर २०१८ ३





**...अप्सरा आली!** औरंगाबादमध्ये शनिवारी 'महागामी' तर्फे आयोजित औरा-औरंगाबाद महोत्सवात ओडिशी नृत्यांगणा सुब्रता त्रिपाठी (नवी दिल्ली) आणि कथक नृत्यांगणा निशा चंदवाणी (मुंबई) यांनी आपल्या नृत्याने रसिकांच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणे फेडले. महोत्सवात रविवारीही सादरीकरण होणार आहे.

रचनेतील मूळ बाज कायम ठेवून नावीन्य आणण्याचा प्रयत्न करीत कलाकारांनी लालित्यपूर्ण पदन्यासाचे दर्शन घडवले. 'धमार' सादरीकरण रसिकांची भरभरुन दाद घेउन गेले.

औरंगाबाद सोमवार, १९ नोव्हेंबर २०१८ महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद TIMES OF INDIA

# पारंपरिक शास्त्रीय नृत्य रचनांना रसिकांची दाद



## 'औरा-औरंगाबाद' उपक्रमाला प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

पारंपरिक रचनांवर आधारीत कथक व भरतनाट्यम सादरीकरणाने 'औरा-औरंगाबाद' नृत्य कार्यक्रम उठावदार झाला. रचनेतील मूळ बाज कायम ठेवून नावीन्य आणण्याचा प्रयत्न करीत कलाकारांनी लालित्यपूर्ण पदन्यासाचे दर्शन घडवले. 'धमार' सादरीकरण रसिकांची भरभरुन दाद घेऊन गेले.

महागामी नृत्य संस्थेच्या 'औरा-औरंगाबाद' नृत्य शृंखलेत अंजना सुधींद्र यांचे भरतनाट्यम आणि प्रियांका श्रीकृष्णन व निलाक्षी खांडेकर यांचे कथक सादर झाले. 'महागामी'च्या सभागृहात शनिवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. अंजना सुधींद्र यांच्या अप्रतिम भरतनाट्यमने कार्यक्रम सुरू झाला. 'नाद तनुमनिषम' रचनेद्वारे भगवान शंकराची वंदना करण्यात आली. सृष्टीचा निर्माता आणि सर्वेश्वर असलेल्या शंकराची विविध माध्यमातून स्तुती करणारी रचना होती. वेगवान पदन्यास आणि मुद्राभिनयाने ही रचना विशेष रंगली. 'राग चित्तरंजनी' व आदितालात असलेल्या रचनेने रसिकांना खिळवून ठेवले. त्यानंतर 'जयदेव अष्टपदी' रचना सादर झाली. राधा कृष्णाला भेटण्यासाठी आतूर असल्याचा संदेश कृष्णापर्यंत पोहचवणारी ही रचना होती. राधेची मनोवस्था आणि तिला वाटणारे कृष्णाबद्दलचे आकर्षण रचनेचे वैशिष्ट्य होते. ही मधूर रचना 'राग अमृतवर्षिणी'त सादर झाली.



प्रियांका श्रीकृष्णन व निलाक्षी खांडेकर

### शास्त्रीय नृत्याचा प्रसार

'औरा-औरंगाबाद' नृत्य शृंखला पारंपरिक शास्त्रीय नृत्याचा प्रसार करीत आहे. शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून मूळ बाज टिकवण्याचा प्रयत्न आहे. औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व पर्यटक व रसिकांपर्यंत पोहचवले जात आहे. वेगवेगळ्या शास्त्रीय नृत्याची सरमिसळ होण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र, शास्त्रीय नृत्याचा उगम आणि वैशिष्ट्ये 'औरा-औरंगाबाद' अधोरेखित करीत आहे.

पारंपरिक 'तिल्लाना' सादरीकरणाने अंजना यांनी सांगता केली. पार्वतीची आराधना करीत तिचे मोठेपण रचनेतून व्यक्त करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात प्रियांका श्रीकृष्णन व निलाक्षी खांडेकर यांचे कथक सादरीकरण झाले. कथक स्तुतीद्वारे पारंपरिक रचनांचे मनोहारी सादरीकरण रंगले. 'पढंत'च्या माध्यमातून नृत्य अधिक उठावदार झाले. त्यानंतर 'धमार' सादर झाले. हा प्रकार नृत्यांगणाचा सराव आणि क्षमता यांची परीक्षा पाहणारा होता. अत्यंत कठीण असलेल्या 'धमार'चे पदलालित्य रसिकांची दाद घेऊन गेले. पं. राजेंद्र गंगाणी यांनी ही रचना नृत्यबद्ध केली होती. पारंपरिक बंदिशींनी नृत्यातील आशय अधिक गडद केला. 'अनादी अनंत' रचनेने कथकची सांगता करण्यात आली. गुरु राजेंद्र गंगाणी यांची रचना जन्म आणि मृत्यू या दोन बाजू सांगणारी होती. सुरुवात आणि शेवट यामधील प्रवास नृत्याच्या माध्यमातून उलगडण्यात आला. या रचनेला चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला 'महागामी'च्या संचालक पार्वती दत्ता यांच्यासह रसिक व पर्यटक उपस्थित होते.



औरंगाबाद में शनिवार को महागामी की ओर से आयोजित औरा-औरंगाबाद कार्यक्रम में नृत्य कला दिखाती हुईं नृत्यांगनाएं.

प्रख्यात नृत्यांगना स्मिता बागुल मोरे ने रविवार को कथ्थक नृत्य के माध्यम से शिव आराधना की शानदार प्रस्तुति दी. पंडित जसराज के शिव ध्यान श्लोक पर थिरकते हुए देवाधिदेव महादेव की वंदना की गई, जिसे तालियों की गड़गड़ाहट से सराहा गया.







औरंगाबाद में रविवार को एमजीएम के महागामी कैंपस में कथक नृत्य के माध्यम से शिव आराधना की प्रस्तुति देती हुई प्रख्यात नृत्यांगना स्मिता बागुल मोरे.

## कथक नृत्य के माध्यम से शिव आराधना की शानदार प्रस्तुति

औरंगाबाद। 12 नवंबर। लोस सेवा

प्रख्यात नृत्यांगना स्मिता बागुल मोरे ने रविवार को कथक नृत्य के माध्यम से शिव आराधना की शानदार प्रस्तुति दी. पंडित जसराज के शिव ध्यान श्लोक पर थिरकते हुए देवाधिदेव महादेव की वंदना की गई, जिसे तालियों की गड़गड़ाहट से सराहा गया. मीरा के भजन पर भी पारंपरिक नृत्य पेश किया.

एमजीएम के महागामी कैंपस में सांस्कृतिक पर्यटन को बढ़ावा देने के लिए विगत 13 अक्टूबर से औरा औरंगाबाद श्रृंखला-6 का आयोजन किया जा रहा है. इसकी परिकल्पना महागामी की निदेशक और नृत्यांगना पार्वती दत्ता ने की है. इसमें प्रख्यात कथक नृत्यांगनाओं को औरंगाबाद में प्रस्तुति देने के लिए बुलाया जा रहा है. ऐतिहासिक धरोहरों को देखने के लिए आने वाले पर्यटकों को भारतीय नृत्य शैली के बारे में जानने का मौका मिल रहा है. प्रत्येक शनिवार और रविवार को शाम 7 से 8 बजे तक होने वाले कार्यक्रमों में दर्शकों की संख्या अच्छी-खासी संख्या रह रही है. अगला कार्यक्रम 17 नवंबर को होगा.



# नृत्यशृंखलेत दमदार सादरीकरण

## औरा औरंगाबाद : कथ्थक आणि भरतनाट्यम नृत्य प्रकारांवर अप्रतिम पदन्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने आयोजित औरा औरंगाबाद नृत्यशृंखलेच्या आठव्या भागाचे १७ व १८ नोव्हेंबर रोजी यशस्वी सादरीकरण करण्यात आले. महागामीच्या संचालिका तथा ज्येष्ठ नृत्यांगना पार्वती दत्ता यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमात रसिकांना शास्त्रीय नृत्याविष्कार बघण्यास मिळाला.

महागामी गुरुकुलच्या शारंगदेव सदन येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शनिवारच्या सत्रात अंजना सुधेंद्र यांनी भरतनाट्यम तर प्रियंका श्रीकृष्णन व नीलाक्षी खांडकर यांनी कथ्थक नृत्य सादर केले. नृत्यांगनांची पदन्यासावर असलेली पकड आणि देहबोली तसेच हावभावातून सादर होणाऱ्या मुद्रा उपस्थित रसिकांशी संवाद साधणाऱ्या ठरल्या. रविवारच्या सत्रात अतनू दास यांनी भरतनाट्यम तर लक्ष्मीनारायण जेना यांनी कथ्थक सादर केले. अतनू यांनी रंजनी माला हे कीर्तन नृत्यमय पद्धतीने सादर केले. यानंतर महाराज स्वाती तिरूनल रचित 'शंकरा श्री...' या हिंदी भजनावर नृत्याविष्कार सादर केला.

दुसऱ्या सत्रात आनंद तांडव या प्रकारात लक्ष्मीनारायण यांनी दाखविलेली ऊर्जा अपूर्व होती. डमरू आणि मृदंगाच्या तालावर त्रिशूळ हलवीत नृत्य करणारे शंकराचे रूप विशेष कौतुकास्पद ठरले. यानंतर सादर झालेल्या 'राधा- माधव..' या नृत्य प्रकारातून त्यांनी श्रीकृष्णाची वाट पाहत व्यथित झालेल्या राधेच्या मनातील खंत दाखविली. 'ताला माला..' या प्रकाराने त्यांच्या नृत्याविष्काराचा समारोप झाला.





औरा- औरंगाबाद नृत्य शृंखलेत नृत्य सादर करताना नर्तक अतनू दास आणि लक्ष्मीनारायण जेना.

3 लोकमत समाचार • अपना औरंगाबाद — औरंगाबाद • मंगलवार 4 दिसंबर 2018

## नृत्यम्



औरंगाबाद में हाल ही में महागामी की ओर से आयोजित औरा-औरंगाबाद नृत्य श्रृंखला में प्रस्तुति देती नृत्य कलाकार.

